सुराज्य सोलापूर



# विधानसभेत सुपरफास्ट ट्रिपल इंजिन महायुतीच्या गाडीला लोकसभेला सुसाट चाललेली महाविकास आघाडी लावणार का 'ब्रेक'

✔ अकलूज/देवानंद साळवे

**सोलापूर जिल्हा तसा काँग्रेस, राष्ट्रवादीचा बालेकिल्ला. या जिल्ह्यानं केवळ सह्याद्रि म्हणजे महाराष्ट्राच्याच नव्हे, तर दिल्लीच्या तख्तालासुद्धा कधी काळी नेतृत्व दिले. सोलापूरचे सुपुत्र सुशीलकुमार शिंदे यांनी पक्षीय पातळीवरील राष्ट्रीय राजकारणामधील तसंच सत्तेमधील अनेक पदं लिलया पेलंली. ज्येष्ठ नेते शरद पवारांसारख्या दिग्गज नेत्यांनं या जिल्ह्याचं नेतृत्व केलं. स्वत:च्या बारामती तालुक्यानंतर लाडका जिल्हा म्हणून सोलापूरवर आभाळगत माया ठेवली. शरद-सुशील नेतृत्वाच्या 'करिष्म्या'नं सहकार पंढरीचा हा जिल्हा काँग्रेस, राष्ट्रवादीचा बालेकिल्ला होता. तथापि, विविध कारणांमुळं इथं सत्तांतर झालं. इथल्या बालेकिल्ल्यात महायुतीनं चांगले पाय रोवले. आगामी विधानसभेलादेखील या जिल्ह्यात महायुतीचं वर्चस्व राहणार का? महायुतीची ट्रिपल इंजिनला सोलापूर जिल्ह्यातून मताधिक्याची ऊर्जा मिळणार का? शिवाय विधानसभा निवडणुकीत सुपरफास्ट ट्रिपल इंजिनच्या महायुतीच्या गाडीला लोकसभेला सुसाट चाललेली महाविकास आघाडी लावणार का 'ब्रेक' हा महत्त्वाचा मुद्दा आत्तपासून चर्चेत येत आहे.**







शिक्षण, साखर आणि सरकार या त्रयींच्या बळावर सोलापूर जिल्ह्याचे राजकारण अवलंबून आहे. हे जरी खरे असले तरी पक्ष आणि व्यक्तीकेंद्रित राजकारणाचा मोठा वारसादेखील सोलापूर जिल्ह्याला आहे.केंद्र आणि राज्य यांच्या सत्ता स्थापनेच्या सोयीसाठी अनेक राजकीय आणि प्रादेशिक पक्ष यांची युती झाली.यामुळे महाराष्ट्रात देखील महायुती आणि महाविकास आघाडी यांची निर्मिती सत्ता स्थापनेसाठी झाली. सध्या सत्तेत असलेली महायुती भाजप, शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यासह काही अन्य घटक पक्षांची मिळून बनलेली आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये याच महायुतीचे १० विद्यमान आमदार आहेत. यामध्ये भाजपचे सर्वात जास्त आमदार माळशिरस, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, सोलापूर शहर उत्तर, पंढरपूर -मंगळवेढा, आणि बार्शीचे भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार असे एकूण सहा आमदार आहेत. तर महायुतींतीलच राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे माढा, करमाळा व मोहोळ या मतदारसंघात ३ आमदार आहेत तर शिवसेनेच्या शिंदे गटाचे सांगोला येथील १ आमदार आहेत.सोलापूर जिल्ह्यात ११ पैकी १० उमेदवार महायुतीचे असताना देखील सोलापूर व माढा मतदारसंघ महायुतीला राखण्यात अपयश आले. आगामी काळात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. अशातच महायुतीच्या जागा वाटपावरून अनेक पेच प्रसंग निर्माण होऊ लागले आहेत.

२०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकी वेळी महायुतीतील घटक पक्ष इतरत्र होते. सद्यस्थितीत महायुतीच्या जागावाटपाची चर्चा निवडून आलेले उमेदवार या पात्रतेनुसार जर करण्यात आली तर भाजप सहा,अजित पवार गट तीन व शिंदे गट एक यानुसार वरिष्ठ स्तरावर मागणी केली जाऊ शकते. एकीकडे भाजपने शिवसेना फोडल्याचा आरोप होत असताना अजित पवारांना शरद पवारांपासून विभक्त केल्याची चर्चा सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे. कदाचित त्यामुळेच लोकसभा निवडणूकीत महायुतीला अपयशाला सामोरे जावे लागल्याची चर्चा रंगली होती.असे असताना माळशिरसचे विद्यमान आमदार राम सातपुते यांना जिंकून आणण्यासाठी भाजपला खूप प्रयत्न करावे लागतील. मोहिते पाटील व उत्तम जानकर यांची युती 'कहीं खुशी, कहीं गम' असली तरीही निवडून येण्यापुरता आकडा महायुतीकडे असल्याचे दिसत नाही.

उपमुख्यमंत्र्यांच्या जवळचे व विश्वासू सचिन कल्याणशेट्टी लोकसभेला म्हणावा असा चमत्कार करू शकले नाहीत. भाजपचे जिल्हाध्यक्ष म्हणून व तरुण चेहरा या नावाखाली आगामी विधानसभा त्यांच्यासाठी काळजीवाहू ठरणार एवढे नक्की.

आपल्या पहिल्याच टर्ममध्ये पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात स्वत:ची छाप निर्माण करण्यात आमदार समाधान आवताडे यांना थोडेफार यश आले असले तरीही प्रशांत परिचारक, कल्याणराव काळे, अभिजित पाटील यासह महायुतीतील अनेक इच्छुक उमेदवारांची मनधरणी करण्यात त्यांची निवडणूक लागणार आहे.

गेली दशकभर भाजपने हस्तगत केलेला दक्षिण सोलापूर मतदारसंघ सुभाष देशमुख यांचा आहे. लोकसभेच्या वेळी दिलीप माने यांनी प्रणिती शिंदे यांच्यासाठी केलेले काम विचारात घेता देशमुखांसाठी ती धोक्याची घंटाच होती की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सोलापूर लोकसभेसाठी सर्वात जास्त चर्चिले गेलेले नाव म्हणजे विजयकुमार देशमुख. शहर उत्तरचे विद्यमान आमदार. भाजपचा बालेकिल्ला व जातीय समीकरणे यामुळे ते जरी फिक्स असले तरीही त्यांच्या विरोधात कोण उभे ठाकणार याबद्दलचे औत्सुक्य कायमचे आहेच.

अपक्ष असून भाजपचे समर्थक असणारे बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत. फडणवीसांच्या निधींचा ओघ तालुक्यात आणण्यात यश मिळवणारे अशी ओळख. परंतु उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत दाखल होणारे दिलीप सोपल यांची राजकीय चाल बार्शी साठी सोपी नसणार एवढे खरे.

माढा व करमाळा या अजित पवार गटाच्या शिंदे बंधूंच्या परगण्यात मोहिते-पाटलांनी चांगलीच उचल खाल्ली आहे. आम्हाला नडले, त्यांना आम्ही पाडले. या घोषवाक्यखाली महायुतीच्या या दोन आमदारांना 'विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती?' असा प्रश्न भेडसावू लागला आहे. तर याच अजित पवारांच्या मोहोळ प्रांतातील आमदार यशवंत माने यांचा प्रवास राजन पाटील यांनी ठरवल्याने सोपा होईल असे वाटत असतानाच महाविकास आघाडीकडून संजय क्षीरसागर काय चमत्कार घडवणार हे औत्सुक्याचे ठरणार आहे.

शिंदे शिवसेना गटाचे नेतृत्व जिल्ह्यातील एकमेव आमदार शहाजी पाटील करताहेत. युतीतीलच दीपक साळुंखे, चेतन सिंह केदार यांची आमदारकीची इच्छा लपून राहिलेली नाही. अशातच देशमुख बंधूंचे मनोमिलन झाल्यास बापूंच्या झाडी, डोंगर व हॉटेलचं स्वप्न पूर्ण होईल का हे पहावी लागणार.

एकूणच महायुतीतील सर्व घटक पक्षातील नेते विद्यमान आमदारांना निवडून देण्यात स्वारस्य दाखवताहेत का? वरिष्ठांचा आदेश म्हणून आपल्या आमदारकीची स्वप्ने गुंडाळून ठेवतील का? शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या नात्याने युतीतील मित्रांचे आघाडीतील नेत्यांचे सख्य आहे का? असे एक ना अनेक प्रश्न सर्वसामान्य लोकांना पडू लागले आहेत.

लोकसभेचा निकाल पाहता विधानसभेचे निकाल त्याच धर्तीवर लागतील असे सांगणे योग्य नाही. परंतु जनता ज्या पद्धतीने महायुतीशी फारकत घेत आहे ते पाहता महायुतीतील नेतेच अस्वस्थ असल्याचे दिसत आहे. जर महायुतीतील पक्ष स्वतंत्रपणे लढले तर सोलापूर जिल्ह्याची राजकीय समीकरणे बदलणार एवढे नक्की आहे. स्मार्ट सिटी, उजनी धरण, जिल्ह्यातील पालकमंत्री या प्रश्नांमुळे महायुती बद्दल असणारी नाराजी विधानसभेच्या निवडणुकीत दिसणार याची पुसटशी कल्पना लोकसभेच्या निकालाने आली आहे. महायुतीतील विद्यमान १० आमदार यांची कारकीर्द पाहता, महायुतीबद्दल जनतेच्या मनातील रोष पाहता तसेच माढा व सोलापूर लोकसभेच्या निकालाचा परामर्श घेतला तर यंदाची विधानसभा महायुतीसाठी जाचक ठरणार की काय असे वाटू लागले आहे.



### आगामी विधानसभा निवडणुकीत काय राहिल चित्र?

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव असणारे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे, ग्रामीण भागावर पकड असणारे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांची सक्रियता पाहता नुकताच पारड्यात पडलेला सोलापूर जिल्हा महायुतीच्या हातातून हळूहळू निसटू लागल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीचे काय चित्र राहील याचे उत्तर येणाऱ्या काळाकडे असेल.

### विधानसभा निवडणुकीत दिसेल वेगळे चित्र

तेव्हा विद्यमान दहा आमदारांची स्वत:ची आमदारकी राखण्यासाठी सुरू असणारी धडपड, महायुतीची जागावाटपावरून सुरु असणारी रस्सीखेच, महायुतीच्या स्थानिक नेत्यांची अंतर्गत असणारी धुसफुस, युती तुटलीच तर स्वतंत्रपणे लढण्याची विद्यमान आमदारांची ताकद,जनतेच्या मनात महायुती विषयी असणारे संभ्रम या साऱ्यांचा परिणाम आगामी विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळणार आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या शिवसेनेला बार्शीत मिळेना नेता एकनाथ शिंदे गटाच्या सेनापतीची दिसेना सरशी

✔ बार्शी/सचिन अपसिंगकर

**२०२२ साली राज्यातील शिवसेना फुटली. त्यावेळी बार्शीतील शिवसेनेचे नेते व माजी मंत्री दिलीप सोपल यांनी ठाकरे गटातच राहण्याची भूमिका घेतली. शिवसेनेत ठाकरेंनी न्याय दिला नाही असे म्हणत भाऊसाहेब आंधळकर यांनी शिंदे सेनेत प्रवेश केला. पण लोकसभा निवडणुकीत आंधळकरांनी शिंदे सेना सोडून वंचित आघाडी कडून निवडणूक लढवली त्यामुळे बार्शीत शिंदेंच्या सेनेला सेनापती उरलेला नाही. शिंदे सेना नेतृत्वापासून 'वंचित' आहे.**

✔ आंधळकरांनी साथ सोडल्यानं सक्षम नेतृत्वाअभावी शिंदे सेना नेत्याअभावी 'वंचित'




बार्शी तशी १९९६ साली शिवसेनेचे शहर प्रमुख पद राजेंद्र राऊत यांनी स्वीकारल्यापासून 'जय भवानी जय शिवाजी'च्या घोषणांनी गर्जत राहिले. पण शिवसेनेच्या माध्यमातून नगरपालिका नगराध्यक्ष, पंचायत समिती, जिल्हा परिषदेवर भगवा फडकला. २००४ साली राजेंद्र राऊत शिवसेनेचे आमदार झाले. २००६ साली ते नारायण राणेंच्या माध्यमातून काँग्रेसवासी झाले. त्यानंतर २०१४ साली राऊत पुन्हा शिवसेनेत आले. त्यांनी २०१४ ची विधानसभा निवडणूक शिवसेनेच्या माध्यमातून लढवली. त्यानंतर त्यांनी भाजपत प्रवेश केला. त्यामुळे बार्शीत शिवसेनेत मुठभर कट्टर शिवसैनिक उरले. त्यानंतर २०१९ साली माजी मंत्री दिलीप सोपल यांनी शिवसेनेत प्रवेश केला त्यामुळे बार्शीत पुन्हा भगवी लाट आली. पण ती २०१९ साली सोपल यांचा पराभव झाल्यामुळे ते भगवे वादळ ओसरले.

आंधळकरांनी शिंदे गड सोडल्यामुळे शिंदे सेनेला वाली नाही. भाऊसाहेब आंधळकर यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या गटाला बार्शीत नेता नाही हे लक्षात घेत आणि आपल्याला अकरा वर्ष ठाकरे गटाने पुनर्वसन केले नाही. या असंतोषांमुळे ठाकरे सेना सोडण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला विजय शिवतारे बार्शीत आले. त्यानंतर आंधळकर यांचे शिंदे गटात बस्तान बसले आहे आणि असं स्थिर झाले आहे असे सर्वांना वाटले. पण आंधळकर यांनी अचानक लोकसभा निवडणुकीत धाराशिव मतदार संघातून वंचित आघाडीच्या वतीने उमेदवारी लढवली. मात्र त्यामुळे बार्शीत शिवसेनेच्या त्याला लावलेले एकमेव नेतृत्व दुसऱ्या पक्षात गेले. त्यामुळे शिवसेनेचा शिंदे गट सध्या नेते पदापासून वंचित आहे.

### ठोंगे-पाटलांकडून मिळेल का प्रभावी नेतृत्व

मूळ बार्शीचे असलेले शिंदे सेना गटाचे जिल्हाप्रमुख लक्ष्मीकांत ठोंगे-पाटील बार्शीत शिंदे गटाला प्रभावी नेतृत्व देतील का असा सवाल शिंदे समर्थकांकडून सध्या विचारला जात आहे.



### महाविकास आघाडी सरकारच्या काळात बार्शीत शिवसेना दिसली निष्क्रिय भूमिकेतच

राज्यामध्ये महाविकास आघाडी सरकार आल्यानंतरच्या कालावधीत शिवसेना अतिशय निष्क्रिय होती. बार्शीमध्ये व्यक्ती केंद्रित राजकारण आहे. त्यामुळे कोणत्याही पक्षाचा बोलबाला फारसा चालत नाही. बार्शीमध्ये नेता म्हणजेच पक्ष आणि गट असतो. त्यामुळे शिवसेनेत असले तरी शिवसेना ही सोपल सेना होती. मात्र २०२२ साली शिवसेनेमध्ये झालेल्या अभूतपूर्व बंडाचे पडसाद बार्शीतही उमटले. राज्यात सर्वत्र शिंदे गटाचा वर चष्मा होता. शिंदे गटाकडे जास्त खासदार जास्त आमदार आणि जास्त पदाधिकारी आहेत, हे चाणाक्ष सोपल यांनी ओळखले होते. सोपल यांनी आपण कोणत्या शिवसेनेत आहोत हे कधीच जाहीरपणे कोणत्याही व्यासपीठावर आणि माध्यमातून सांगितले नाही. लोकसभा निवडणुका लागल्या त्याही वेळेला सोपल सावधच होते. सोपल गटाने ओमराजे निंबाळकर यांचा प्रचार केला. आता त्यांना नवसंजीवनी मिळाली आहे. त्यामुळे सोपल ठाकरे गटाचा झेंडा अभिमानाने उंचावत फडफडत ठेवणार हे नक्की आहे.

# विधानसभेला स्व:बळाचा २८८चा मॅजिक फिगर सुशीलकुमारांच्या भेटीला काँग्रेसचे जयवंतराव जिगर

✔ करमाळा-सोलापूर/प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीचा धुराळा खाली बसल्यानंतर आता विधानसभा निवडणुकीचा मोहोल सर्वत्र दिसू लागला आहे. तशा प्रमुख पक्षांमध्ये वेगवेगळ्या घटना-घडामोडीदेखील घडू लागल्या आहेत. महाविकास आघाडीकडून विधानसभेची निवडणूक लढूया, असं मित्र पक्षांना सांगणाऱ्या काँग्रेसनं राज्यातील विधानसभेच्या सर्वच्या सर्व म्हणजे तब्बल २८८ जागा स्व:बळावर लढविण्यासाठी चाचपणी सुरु केली आहे. त्या पार्श्वभूमीवर, मतदार संघ निहाय माहिती संकलित करण्याचं काम चालू केलं आहे. याची कुणकुण लागताच करमाळ्यात जगताप गट पुढं सरसावला आहे. विशेषत्वे, याच अनुषंगाने, माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते सुशीलकुमार शिंदे यांची भेट घेऊन विधानसभा लढण्याबद्दल चर्चा केल्याच्या घडामोडीनं मुख्य काँग्रेस सर्वच प्रमुख विरोधी पक्षांमधील नेतेमंडळींच्या भूवया उंचावल्या गेल्या आहेत.**

माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी करमाळ्याची विधानसभा काँग्रेसच्या हाताच्या चिन्हावर लढण्याच्या धर्तीवरच सुशीलकुमार शिंदेंची भेट घेतली अशी वार्ता संपूर्ण करमाळा-माढा तालुक्यात वाऱ्यासारखी पसरल्यानं सर्वत्र याबद्दलच्या चर्चेला उधाण आलं आहे. तथापि, सुशीलकुमार शिंदे आणि जयवंतराव जगताप या दोघांना भेटीबद्दल बोलतं केलं असता सहज खूप दिवसांनी आम्ही भेटलो, जी भेट झाली ती सद्इच्छा भेट होती असंच दोघांकडून सर्मपक उत्तर दिलं गेलं. त्यामुळं भेटीसंदर्भात माहितीचा अधिक तपशील मिळू शकला नाही.

### आत्ताच भेटण्याचे कारण काय?

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना भेटल्याबद्दल माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, सुशीलकुमार शिंदे आणि माझे अत्यंत जवळचे स्नेहसंबंध आहेत. जसे की ज्येष्ठ नेते शरद पवार आणि विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याशीदेखील आहेत. प्रेमापोटीच्या स्नेहसंबंधातून आम्ही भेटलो. विधानसभा निवडणुकीचा आणि भेटीचा कसलाही संबंध नाही, असा निर्वाळा जगताप यांनी दिला आहे. तथापि, जयवंतराव जगताप हे सुशीलकुमारांच्या भेटीला आत्ताच का गेले, असा मुद्दा उपस्थित केला जात असून याच मुद्याभोवती करमाळा तालुक्यात चर्चा सुरु झाली आहे.

### लोकसभेला जयवंतरावांनी केलं होतं मोहिते-पाटलांचं काम

माढा लोकसभेच्या निवडणुकीवेळी माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांचं काम केलं होतं. या दरम्यान त्यांनी शरद पवार आणि विजयसिंह मोहिते-पाटील यांची भेट घेतली होती. तर दुसरीकडं त्यांचे सुपुत्र शंभूराजे जगताप यांच्यावर माढा लोकसभेच्या निवड णुकीत पक्षविरोधी कारवाया करुन पक्षाच्या उमेदवाराचे काम न करता विरोधी उमेदवाराचं काम केल्याचा ठपका ठेवून त्यांना भाजपमधून डच्चू देण्यात आला आहे. हे लक्षात घेता जयवंतराव जगताप हे काँग्रेसकडून लढताना त्यांचे सुपुत्र शंभूराजे हे त्यांना निवडून आणण्यासाठी काँग्रेसमधून सक्रीय होऊ शकतात, असा कयास काढला जात आहे.



### आमदार संजयमामा शिंदे गटात अस्वस्थता

करमाळ्यातुन विधानसभेची निवडणूक लढविताना आमदार संजयमामा शिंदे यांना माजी आमदार जयवंतराव जगताप गटाची मदत झाली होती. संजयमामा शिंदे हे आमदार होण्यात जगताप गटाचे योगदान राहिले होते. दरम्यान, या खेपेच्या विधानसभेलादेखील जगताप गटाची मदत आमदार संजयमामा शिंदे यांना होणार हे अपेक्षित आहे, असं मानलं जातं. अशातच खुद्द जगतापच विधानसभा लढण्याचे संकेत असल्यानं आमदार संजयमामा शिंदे गोटात अस्वस्थता पसरल्याची चर्चा करमाळा आणि माढा तालुक्यात आहे.